## महाराष्ट्र शासन

क्र.व्हीओसी-२०१४/प्र.क्र.१२६/व्यशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक:- २२ ऑगस्ट, २०१४.

प्रति,

संचालक (व्यवसाय शिक्षण),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
मुंबई.

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
बांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

विषय:- महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या संस्थेतील अभ्यासक्रम नुतनीकरण करण्यास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मान्यता देण्याबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०१४/प्र.क्र.१२६/व्यशि-४, दि.५.८.२०१४
२) राष्ट्रीय अपंग असोसिएशन अमरावती.
३) डेव्हलपमेंट एज्युकेशन एम्पॉवरमेंट ऑफ दि डिसअॅडव्हॅन्टेज इन सोसायटी मुंबई या संस्थेचे दि.४.८.२०१४ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्याचे निदेश आहेत की, शासनाच्या संदर्भाधीन दि.५.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाचे सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षासाठी नुतनीकरण करण्यास शासन निर्णयातील विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

नुतनीकरण -- सीआर

तद्वतच उक्त संदर्भाधीन २ व ३ येथील संस्थेने राज्यातील अपंग संस्थेमध्ये शिकणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत व तरतूद उक्त दि.५.८.२०१४ च्या शासन निर्णयामध्ये देण्यासाठीचा निर्णय घेण्यात आलेला नाही. तथापि, वरील संस्थांनी केलेल्या विनंतीनुसार राज्यातील ज्या अपंग विद्यार्थ्यांना अशा संस्थांमधून विशेष प्रशिक्षण देण्यात येते अशा विद्यार्थ्यांना उक्त शासन निर्णयातील विविध अटीप्रमाणे विशेष सवलत देऊनत्यांना अनुक्रमे शहरी भागात ४०% व ग्रामीण भागात ३०% एवढया प्रवेशाची अट देण्यात येत आहे म्हणजेच वरील अटीमध्ये १०% एवढी कमी सवलत देण्यास मान्यता देण्यात येत आहे

याशिवाय सदर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेले अर्ज किंवा प्रवेश प्रक्रिया विहित मुदतीत करण्यासाठी राज्यातील ज्या संस्थांकडून विलंब झाल्यामुळे जर ही प्रक्रिया विहित मुदती नंतरही पूर्ण केली नसेल तर, अशा संस्थांकडून प्राप्त झालेल्या निवेदनाप्रमाणे या संस्थांना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दि.३१.८.२०१४ पर्यंत सदर शासन निर्णयातील अटीच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

यास्तव सदर संस्थांना ही मुदतवाढ देताना या संस्थांना कमीत कमी १०,०००/- रुपये एवढी दंडात्मक कार्यवाही केल्यानंतरच त्यांच्या नुतनीकरणाची विनंती मान्य करण्यात यावी. जर सदर संस्थांनी त्यांना देण्यात आलेल्या विहित मुदतीनंतरही ही प्रक्रिया चालू वर्षी पूर्ण केली नाही तर अशा संस्थांना रुपये २५,०००/- पर्यंतची दंडात्मक कार्यवाही करुन शेवटची संधी एक वेळेसाठी देण्यात येत असून त्यांच्या नुतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

आपला

(रा.गो.जाधव)
शासनाचे सह सचिव